# मंत्रिमंडळ निर्णय

## बैठक क्र. ७२-७५

**( विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशन कालावधीतील बैठका )**

**दिनांक : २७ जून २०२४ ते १२ जुलै २०२४**

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण | निर्णयांची संख्या |
|---|---|---|---|
| ७२ | २८ जून | विधानभवन, मुंबई | ४ |
| ७३ | ५ जुलै | विधानभवन, मुंबई | १८ |
| ७४ | ८ जुलै | विधानभवन, मुंबई | ३ |
| ७५ | ११ जुलै | विधानभवन, मुंबई | ८ |
| | | **एकूण** | ३३ |

# मंत्रिमंडळ बैठक
# दि. २८ जून २०२४
# एकूण निर्णय- ४

क्रीडा विभाग

**अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना थेट शासन सेवेत**

अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना थेट शासन सेवेत घेण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

सध्या राज्यात १२७ क्रीडा मार्गदर्शकांची पदे असून १५३ मानधन तत्वावरील पदे आहेत. आज झालेल्या निर्णयानुसार ही पदे नियमित करण्यात येऊन २७१ आणखी नवी पदे निर्माण करण्यात येतील. अशा तऱ्हेने एकूण ५५१ पदांना मंजुरी देण्यात आली. या गुणवत्ताधारक खेळाडूंना नव्याने निर्माण केलेल्या पदांवर नियुक्त केले जाईल. यामध्ये सह संचालक, क्रीडा प्रशिक्षण, उपसंचालक, क्रीडा प्रशिक्षण, मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी, क्रीडा कार्यकारी अधिकारी (प्रशिक्षण), क्रीडा विकास अधिकारी (प्रशिक्षण) आणि सहायक क्रीडा विकास अधिकारी (प्रशिक्षण) या पदांचा समावेश आहे.

-----०-----

नगर विकास विभाग

**मेट्रो मार्ग-१ अधिग्रहणाचा निर्णय रद्द**

मेट्रो लाईन-१ चे एमएमआरडीए करण्यात असलेले अधिग्रहण रद्द करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यापूर्वी ११ मार्च २०२४ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मेट्रो मार्ग-१ चे अधिग्रहण करण्याचा निर्णय झाला होता तो आता रद्द झाला आहे. डीएसके लिगल, एमएमएमओसीएल/आई आणि मे.बीडीओ या सल्लागार संस्थांची निरिक्षणे तसेच केंद्र शासनाची व्हीजीएफ संदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे आणि एमएमआरडीएद्वारे राज्य शासनाला आर्थिक सहाय्याची केलेली विनंती विचारात घेता हा निर्णय घेण्यात आला.

-----०-----

सार्वजनिक बांधकाम विभाग

## विरार ते अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर, पुणे रिंग रोड भूसंपादनासाठी कर्जरोखे

विरार ते अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉरसाठी उभारण्यासाठी भूसंपादनाकरिता येणाऱ्या खर्चाकरिता कर्जरोख्यानी २७ हजार ७५० कोटी निधी उभारण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या कर्जरोख्यांचा कालावधी १५ वर्षांचा असेल तसेच कमाल ८.९९ टक्के व्याजदर असेल. विरार ते अलिबाग प्रकल्पासाठी २२ हजार २५० कोटी रुपये आणि पुणे रिंग रोड प्रकल्पासाठी भूसंपादनाकरिता ५ हजार ५०० कोटी रुपये खर्च येईल.

-----०-----

सामान्य प्रशासन विभाग

## शासनातील ब आणि क गटातील पदे लोकसेवा आयोगामार्फत भरणार

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्य शासनाच्या गट ब अराजपत्रित आणि गट क ही पदे भरण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. सध्या ही पदे विविध निवड समित्यांमार्फत भरण्यात येतात.

सध्या गट अ, गट ब (राजपत्रित) तसेच लोकसेवा आयोगाच्या कक्षतील गट ब (अराजपत्रित) पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येतात. आयोगाच्या कक्षेवाहेरील सरळ सेवेची रिक्त पदे सध्या ऑनलाईन पद्धतीने टीसीएस व आयबीपीस या कंपन्यांमार्फत भरण्यात येतात. आता टप्प्याटप्प्याने गट ब अराजपत्रित आणि गट क वाहनचालक वगळून ही पदे आयोगामार्फत भरण्यात येतील. यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला सक्षम करण्यात येईल. त्यासाठी अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली एक समन्वय समिती देखील गठीत करण्यात येईल. १ जानेवारी २०२६ पासून ही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येतील.

-----०-----

# मंत्रिमंडळ बैठक
# दि. ५ जुलै २०२४
# एकूण निर्णय-१८

विधि व न्याय विभाग

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमात सुधारणा**
**धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित जागा दुर्बल रुग्णांना**

निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित जागा उपलब्ध करून देण्यासाठी सुधारणा करण्याचा त्याचप्रमाणे धर्मादाय आयुक्त, धर्मादाय सह आयुक्त यांच्या नियुक्तीबाबत बदल करण्यात आले असून त्यादृष्टीने महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ या पदासाठी उच्च गुणवत्ता व अनुभव आकर्षित करण्याकरिता दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी या पदांच्या धर्तीवर अर्हता निश्चित करण्यात येतील. या पदासाठी विभागीय पात्रता परीक्षेद्वारे पदोन्नतीने रिक्त जागा भरण्यासाठी सेवाप्रवेश नियम तयार करण्यात येतील.

-----०-----

पदूम विभाग

**दूध अनुदान योजना सप्टेंबरपर्यंत**

दूध अनुदान योजना ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत वाढविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यातील सहकारी दूध संघ व खासगी दूध प्रकल्पांना दूध पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना दूधासाठी प्रती लिटर ५ रुपये अनुदान देण्यात येत होते. ही योजना ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत राबविण्यात येईल. राज्यातील जे प्रकल्प दूध भूकटी निर्यात करतील त्यांना ३० रुपये प्रती किलो प्रोत्साहनपर अनुदान देखील देण्यात येईल. १ जुलै २०२४ ते ३० सप्टेंबर २०२४ या कालावधीतील निर्यात होणाऱ्या दूध भूकटीस हे अनुदान मिळेल.

-----०-----

सहकार विभाग

## काजू उत्पादकांना अनुदान

राज्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना शासन अनुदान देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या शेतकऱ्यांना प्रती किलो काजू बी साठी १० रुपये या प्रमाणे किमान ५० किलो आणि कमाल २ हजार किलो या मर्यादेत अनुदान देण्यासाठी २७९ कोटी इतक्या खर्चास देखील मान्यता देण्यात आली.

-----०-----

उद्योग विभाग

## विदर्भ, मराठवाड्यातील उद्योगांना विद्युत शुल्क माफीस मुदतवाढ

राज्यातील विदर्भ, मराठवाडा विभागांमधील जिल्हयात अस्तित्वात असलेल्या व नव्याने स्थापित होणाऱ्या उद्योग घटकांना देण्यात येणाऱ्या विद्युत शुल्क माफीच्या कालावधीस दि.०१.०४.२०२४ पासून दि.३१.०३.२०२९ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

सदर विद्युत शुल्क माफीच्या सवलतीमुळे मराठवाडा व विदर्भ भागांतील सध्या अस्तित्वातील ५६५९ उद्योगांना तसेच नव्याने अस्तित्वात येणाऱ्या उद्योगांना या निर्णयाचा लाभ होणार असून, यासाठी राज्य शासनावर पुढील ५ वर्षामध्ये अंदाजे रूपये ९६३ कोटी एवढा आर्थिक भार पडणार आहे. या निर्णयामुळे विदर्भ, मराठवाडा या क्षेत्रामध्ये गुंतवणूक व रोजगार वाढून शासनाच्या महसूलात सुध्दा भर पडणार आहे. तसेच या अविकसित क्षेत्राचा सर्वंकष विकास होण्यास चालना मिळेल.

मराठवाडा व विदर्भ क्षेत्रातील उद्योगांना बाजारपेठा दूर असल्याने बाजारपेठेचा लाभ घेण्यास अडचणी येतात. राज्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी, मराठवाडा व विदर्भ विभागाचा औद्योगिक विकास होणे आवश्यक आहे. यासाठी मराठवाडा व विदर्भ विभागातील उद्योगांना स्पर्धात्मक युगात टिकून राहण्याकरीता सक्षम करणे आवश्यक आहे. या कारणास्तव विदर्भ, मराठवाडा क्षेत्रातील अस्तित्वातील तसेच नव्याने स्थापित होणाऱ्या सर्व उद्योगांना शासनाने विद्युत शुल्क माफीची सवलत दिली होती. सदर विद्युत शुल्क माफीच्या कालावधीस शासनाने वेळोवेळी मुदतवाढ दिली आहे. दि.२८.०५.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या विद्युत शुल्क माफीचा ५ वर्षाचा कालावधी दि.३१.०३.२०२४ रोजी संपुष्टात आलेला आहे.

विद्युत शुल्क माफीच्या सवलतीमुळे औद्योगिक क्षेत्रातील घटकांना बाजारपेठेत स्पर्धेत टिकून राहण्यास मोठया प्रमाणात मदत झाली आहे. मराठवाडा, विदर्भातील उद्योगांना सदर विद्युत शुल्क माफीची सवलत न दिल्यास या भागातील सर्व उद्योगांवर मुख्यत्वेकरुन सुक्ष्म, लघु, आणि मध्यम उद्योगांवर मोठा आर्थिक भार पडू शकतो आणि उद्योगांच्या कॅश फ्लो वर (रोख व्यवहारावर) दूरगामी परिणाम होऊन स्थानिक बाजारपेठेत तसेच आणि निर्यात करण्यास या क्षेत्रातील उद्योग असमर्थ ठरतील. ही बाब लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला.

-----०-----

कौशल्य विकास विभाग

## जर्मनीतील बाडेन वुटेनबर्ग राज्यास कुशल मनुष्यबळ

जर्मनीतील बाडेन वुटेनबर्ग राज्यास विविध क्षेत्रातील १०,००० कुशल मनुष्यबळ पुरविण्याबाबतच्या पथदर्शी प्रकल्पास मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

जर्मनीतील बाडेन बुटेनबर्ग राज्याशी करण्यात आलेल्या सामंजस्य कराराच्या पार्श्वभूमीवर पथदर्शी तत्वावर पहिल्या टप्यात विविध क्षेत्रातील किमान १०,००० कुशल मनुष्यबळ त्या राज्यास उपलब्ध करुन देण्यासाठी यंत्रणा, कार्यपद्धती, प्रशिक्षणाची व्यवस्था व वित्तीय तरतूद यास मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पामुळे विविध कौशल्य धारण करणाऱ्या राज्यातील युवक/युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून अधिक अर्थार्जनामुळे त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे. बेरोजगारीच्या समस्या कमी होण्यास यामुळे काही प्रमाणात हातभार लागणार आहे.

तंत्रज्ञानाचे हस्तांतरण, कौशल्यवृद्धी व त्यातून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे थेट परकीय गुंतवणूक या मार्गानी राज्यास लाभ होणार आहे.

-----०-----

शालेय शिक्षण विभाग

## प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतील स्वयंपाकींचे मानधन वाढविले

प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतील आवश्यक असलेल्या अतिरिक्त निधीस मान्यता देण्याचा व कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या मासिक मानधनात वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

सदर योजनेंतर्गत कार्यरत असणाऱ्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या सद्यस्थितीत असणाऱ्या रु.२५००/- प्रति महा मानधनामधील राज्य हिस्स्सामध्ये रु.१०००/- प्रति महा इतकी वाढ करुन प्रति महा रु.३५००/- इतके मानधन अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यासाठी लागणारा एकूण रु.१७५.२० कोटी वार्षिक निधी मंजूर करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे

राज्य व केंद्र शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळेमधील इ.१ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना प्रस्तुत योजनेंतर्गत लाभ देण्यात येतो. विद्यार्थ्यांच्या पोषण आहारात वैविध्यता आणण्यासाठी विद्यार्थ्यांना तीन संरचित आहार (Three Course Meal) पध्दतीनुसार (तांदूळ, डाळी / कडधान्यापासून तयार केलेला आहार, मोड आलेले कडधान्य (स्प्राऊटस) व गोड पदार्थ म्हणून तांदळाची खीर व नाचणीसत्व) आहार देण्याचा निर्णय दि.११ जून, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून प्रस्तुतप्रमाणे विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ देण्यात येणार आहे.

सदर योजनेंतर्गत तीन संरचित आहार पध्दतीप्रमाणे पोषण आहाराचा लाभ देण्यासाठी अतिरिक्त एकूण रु.६६.६७ कोटी इतका वार्षिक निधी सदर योजनेच्या सर्वसाधारण घटकांतर्गतच्या राज्य हिस्स्यामध्ये मंजूर करुन खर्च करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

-----०-----

महिला व बालकल्याण विभाग

## गरजू महिलांना पिंक रिक्षा

राज्यातील १० हजार गरजू महिलांना पिंक ई-रिक्षा देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या योजनेसाठी राज्य शासनावर २० टक्के या प्रमाणात म्हणजे ८० कोटी इतका भार येईल. इच्छुक महिला या रिक्षासाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी या कार्यालयास अर्ज करतील. या अर्जाची अंतिम छाननी जिल्हाधिकारी यांची समिती करेल. योजनेसाठी लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३ लाखापेक्षा जास्त नसावे तसेच वाहन चालक परवाना आवश्यक राहील. नागरी सहकारी बँका किंवा राष्ट्रीयकृत बँकांकडून ई-रिक्षा किंमतीच्या ७० टक्के कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल. राज्य शासन २० टक्के भार उचलेल तर लाभार्थीला १० टक्के रक्कम टाकावी लागेल.

या योजनेमुळे महिलांच्या रोजगार निर्मितीस चालना मिळेल.

-----०-----

महसूल विभाग

## नाशिक, अमरावती येथे भूसंपादन प्राधिकरण

नाशिक आणि अमरावती येथे स्वतंत्र भूसंपादन, पुनर्वसन आणि पुन:र्स्थापना प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

सध्या नागपूर व अमरावती महसूल विभागाकरिता नागपूर व नाशिक, पुणे, कोकण आणि छत्रपती संभाजीनगर या ४ विभागांसाठी छत्रपती संभाजीनगर येथे प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. सध्या मोठ्या प्रमाणावर ज्या विभागांमध्ये भूसंपादन मोबदला आणि इतर प्रकरणे प्रलंबित आहेत अशा ठिकाणी जलदगतीने निपटारा होण्यासाठी नाशिक, कोकण, पुणे या महसुली विभागांसाठी नाशिक येथे आणि केवळ अमरावती महसूल विभागांसाठी अमरावती येथे स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

-----०-----

ग्राम विकास विभाग

## लोकवस्त्यांना बारमाही रस्त्यांने जोडणार

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान अंतर्गत आदिम जमातीतील पात्र लोकवस्त्यांना प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर बारमाही रस्त्यांनी जोडण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यामुळे कोलाम, कातकरी, काथोडी, माडीयागोंड या आदिवासींच्या लोकवस्त्यांना जोडण्यात येईल. यासाठी ६० टक्के हिस्सा केंद्राचा आणि ४० टक्के हिस्सा राज्याचा राहील.

-----०-----

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## हात पंप, वीज पंप देखभाल कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी अनुदान

जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील हात पंप, वीज पंप यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांच्या भत्त्यासाठी नियमित तरतूद करण्याबाबत आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते जिल्हा परिषदेमार्फत देण्यात येतील. जिल्हा परिषदांनी वसुलीसाठी प्रयत्न करावेत तसेच ग्रामपंचायतींना देय अन्य निधीतून परस्पर वर्गणी कपात करावी. जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाच्या २० टक्के निधी देखभाल दुरुस्ती निधीत जमा करावा. १ नोव्हेंबर २००५ नियुक्त कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदायी निवृत्ती योजना / नवीन निवृत्ती योजना लागू राहील.

-----o-----

गृह विभाग

## राज्यात नव्या मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा तज्ज्ञांकडून घटनास्थळांवर भेट देण्यासाठी २५४ मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स खरेदी करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या व्हॅन्स आवश्यक तो मनुष्यबळ पुरवठा, फॉरेन्सिक किट्स, रसायने तसेच सॉफ्टवेअर खरेदीसाठी १३७२ कोटी ३६ लाख रुपयांस आज मंजुरी देण्यात आली. पहिल्या टप्प्यात प्रायोगिक तत्वावर २१ मोबाईल्स व्हॅन्स वापरण्यात येतील.

-----o-----

दिव्यांग कल्याण विभाग

## दिव्यांगांच्या शाळा, मतिमंद बालगृहे यांना अनुदान

राज्यातील कायमस्वरुपी विनाअनुदानित दिव्यांगांच्या शाळा, वसतीगृहे, कार्यशाळा आणि अनाथ मतिमंद बालगृहे यांना अनुदान मंजूर करण्यासाठी धोरण निश्चित करण्यात आले. या संदर्भात आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

एकंदर १३४ शाळांना प्रती शाळा २५ निवासी विद्यार्थ्यांना अनुदान देण्यासाठी ६१ कोटी ७४ लाख रुपये खर्चास मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे या शाळांना अनुदान देण्याबाबतचे अटी व शर्तीसह धोरण ठरविण्यात आले.

-----o-----

शालेय शिक्षण विभाग

## शालेय शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ

राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षण सेवकांच्या मानधनात १० हजार रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण सेवकांना आता १६ हजार रुपये दरमहा, माध्यमिक शिक्षण सेवकांना १८ हजार रुपये दरमहा आणि उच्च माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षण सेवकांना २० हजार रुपये सुधारित मानधन मिळेल. १ जानेवारी २०२३ पासून ही वाढ मिळेल.

-----०-----

गृह विभाग

## वरणगाव येथे एसआरपीची तुकडी

जळगाव जिल्ह्यातील भुसावळ मधील वरणगाव येथे राज्य राखीव पोलीस बलाचा नवीन गट निर्माण करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यासाठी एकूण १३८० नवीन पदे निर्माण करण्यात येतील तसेच यासाठी लागणाऱ्या १५२ कोटी २६ लाख २३ हजार ४०४ इतका अनावर्ती खर्च व ६३ कोटी ६९ लाख ९६ हजार ५४० इतक्या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात आली.

-----०-----

गृह विभाग

## अश्वारुढ पोलीस दलासाठी खर्चास मान्यता

अश्वारुढ म्हणजेच माऊन्टेड पोलीस दलासाठी खर्चास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

हे पोलीस दल प्रभावीपणे काम करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. यानुसार बृहन्मुंबई पोलीस आयुक्तांच्या आस्थापनेवरील या दलासाठी १ कोटी ८८ लाख ७५ हजार ५१० या आवर्ती तसेच ३६ कोटी ५३ लाख १३ हजार इतक्या अनावर्ती खर्चास मान्यता देण्यात आली.

-----०-----

गृह विभाग

## राज्यात स्थानबद्धता केंद्र स्थापणार

राज्यात स्थानबद्धता केंद्र स्थापण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

व्हिसा मुदत संपलेले विदेशी नागरिक, कारागृहातून शिक्षा भोगून मुक्त झालेले विदेशी नागरिक तसेच विविध कारणांसाठी मायदेशी परत न गेलेल्या विदेशी नागरिकांना या स्थानबद्धता केंद्रात ठेवण्यात येईल. भोईवाडा येथे ८० क्षमतेचे आणि तळोजा येथे २१३ क्षमतेची २ केंद्रे स्थापन करण्यात येतील. या दोन्ही केंद्रांसाठी प्रशासकीय कारणासाठी ४.०८ कोटी एवढ्या निधीस मान्यता देण्यात आली. तळोजा येथील कायमस्वरुपी केंद्राच्या बांधकामासाठी ४६ कोटी एवढा खर्च लागेल. तसेच या केंद्रास सुरक्षेसाठी ८.४४ कोटी एवढा खर्च येईल.

-----०-----

कौशल्य विकास विभाग

## मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना

राज्यात मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना राबविण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. यामधून १० लाख युवकांना प्रशिक्षित करण्यात येईल.

या योजनेसाठी ५ हजार ५८५ कोटी निधी उपलब्ध करून देण्यासही मान्यता देण्यात आली. या आर्थिक वर्षापासून सुरु करण्यात येत असलेल्या या योजनेत ६ महिन्यांसाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. याकरिता प्रशिक्षणार्थींना १२ वी पास असल्यास ८ हजार रुपये, आयटीआय/पदविका ९ हजार रुपये, पदवीधर/पदव्युत्तर १० हजार रुपये दरमहा विद्यावेतन दिले जाईल.

यातील ५ हजार लोकसंख्येसाठी एक या प्रमाणे योजनादुतांची नियुक्ती देखील करण्यात येणार आहे. हे योजनादूत जनतेस योजनांची माहिती देणे, लाभार्थींकडून अर्ज भरून घेणे, योजनेचा लाभ लाभार्थींना देणे ही कामे करतील. या योजनेसाठी कौशल्य विकास विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी करण्यात येईल. तसेच मुख्यमंत्री जनकल्याण कक्षामार्फत संनियंत्रण केले जाईल.

-----o-----

पर्यटन विभाग

## नव्या पर्यटन धोरणास मान्यता

राज्याच्या नव्या पर्यटन धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या धोरणाद्वारे १ लाख कोटी नवीन खासगी गुंतवणूक आकर्षित करण्यात येऊन १८ लाख रोजगार निर्माण करण्यात येईल. पर्यटन क्षेत्रांचा विकास करून राज्याचा महसूल देखील वाढविण्यात येईल. यामध्ये ग्रामीण पर्यटन, कॅराव्हॅन पर्यटन, इको टुरिझम, कृषी पर्यटन, क्रुझ पर्यटन अशी विविध पर्यटनास चालना देण्यात येईल. याशिवाय उत्कृष्ट पर्यटनासाठी पुरस्कारही देण्यात येतील. तसेच पर्यटनाशी संबंधित कौशल्य विकासास चालना देण्यात येईल.

-----o-----

# मंत्रिमंडळ बैठक
# दि. ८ जुलै २०२४
# एकूण निर्णय- ३

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## मुलींना मोफत व्यावसायिक शिक्षण

राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास व इतर मागास आणि अनाथ गटातील विद्यार्थींनीना व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी १०० टक्के शिक्षण आणि परीक्षा शुल्क माफी देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

सध्या उच्च तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, कृषी, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय या विभागांच्या शैक्षणिक संस्थांद्वारे विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी इतर मागास, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभ देण्यात येतो. आता या निर्णयामुळे १०० टक्के लाभ होईल. या १०० टक्के सवलतीचा लाभ आता अनाथ मुलींना सुद्धा होईल. ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा मुलींना याचा लाभ मिळेल. यासाठी यावर्षीपासून येणाऱ्या अतिरिक्त ९०६ कोटी ५ लाख एवढ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

-----०-----

कौशल्य विकास विभाग

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
## महिला स्टार्टअप योजना

राज्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना राबविण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या योजनेत महिला नेतृत्वातील १० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंत उलाढाल असलेल्या स्टार्टअपना १ लाख ते २५ लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येईल. यासाठी १०० कोटी रुपये इतका निधी अतिरिक्त स्वरुपात उपलब्ध करून देण्यात येईल. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीस अंमलबजावणी संस्था म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

सामान्य प्रशासन विभाग

## स्पर्धा परीक्षांतील गैरप्रकार थांबविण्यासाठी कायदा करणार

राज्यातील स्पर्धा परीक्षांतील गैरप्रकार थांबविण्यासाठी कायदा करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या अनुषंगाने महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित गैरप्रकाराना प्रतिबंध) विधेयक २०२४ च्या प्रारुपात बदल करण्यात येतील व विधीमंडळात हे विधेयक मांडण्यात येईल.

-----०-----

# मंत्रिमंडळ बैठक
# दि. ११ जुलै २०२४
# एकूण निर्णय- ८

गृह विभाग

## अश्व शर्यतींसाठी परवाना शुल्क निश्चित

मुंबईतील रॉयल वेस्टर्न क्लबला मुंबई आणि पुणे अश्व शर्यतींसाठी १ कोटी रुपये इतकी परवाना फी आकारण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

महाराष्ट्र रेसकोर्स लायसन्स कायदा १९१२ नुसार रॉयल वेस्टर्न क्लबला १ जुलै ते ३० जून या कालावधीसाठी ७० दिवस अश्वशर्यती आयोजित करण्याकरिता परवाना दिला जातो. यापैकी १५ अश्वशर्यती आयोजन हे चॅरिटी रेसकरिता करणे क्लबला बंधनकारक आहे.

-----०-----

अन्न,नागरी पुरवठा विभाग

## मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेत वर्षाला ३ गॅस सिलेंडर मोफत

राज्य शासनाकडून पात्र कुटूंबांना ३ गॅस सिलेंडर वर्षाला मोफत देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यासंदर्भात नुकत्याच झालेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पात वित्त मंत्र्यांनी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना घोषित केली होती. या निर्णयासाठी राज्य शासनाकडून देण्यात येणारी रक्कम थेट ग्राहकांच्या खात्यावर जमा होणार असून एकंदर ८२९ कोटी ४० लाख ५५ हजार ८० इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली.

-----०-----

कृषी विभाग

## कापूस, सोयाबिन शेतकऱ्यांना अर्थसहाय्य

खरीप हंगाम २०२३ मधील कापूस सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

ज्या शेतकऱ्यांकडे ०.२ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्र आहे अशांना सरसकट १ हजार रुपये तर ०.२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांना प्रती हेक्टर ५ हजार रुपये २ हेक्टरच्या मर्यादेत अर्थसहाय्य देण्यात येईल. यासाठी ४ हजार १९४ कोटी ६८ लाख रुपये खर्च येईल.

-----०-----

सामाजिक न्याय विभाग

## मातंग समाजासाठी आर्टी संस्थेची स्थापना

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) च्या धर्तीवर मातंग समाजासाठी अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी) स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यामध्ये सामाजिक समतेची तत्व प्रणाली समाजात जास्तीत जास्त कशी परिणामकारक होईल याबाबतीमध्ये संशोधन करण्यात येईल. याशिवाय विविध परंपरागत व्यवसायांना चालना देणे, संमेलने व्याख्यान, चर्चासत्र आयोजित करणे, रोजगार निर्मिती, स्टार्टअप यांना प्रोत्साहन असे या संस्थेमार्फत करण्यात येईल. या संस्थेत एक महासंचालक व एक निबंधक अशी २ पदे देखील मंजूर करण्यात आली आहेत. या संस्थेचे कामकाज चिरागनगर, घाटकोपर येथून होईल.

-----०-----

सामाजिक न्याय विभाग

## मुख्यमंत्री वारकरी महामंडळ स्थापन

राज्यात मुख्यमंत्री वारकरी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या महामंडळाचे मुख्यालय पंढरपूर येथे असेल तसेच महामंडळावर भाप्रसे अधिकाऱ्याची व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात येईल. या महामंडळाद्वारे सर्व तीर्थक्षेत्रांचा विकास, किर्तनकार, वारकऱ्यांसाठी सोयी सुविधा निर्माण करण्यात येतील. पालखी सोहळ्यांच्या मार्गाची सुधारणा करण्यात येईल. तसेच किर्तनकारांना आरोग्य विमा, मानधन योजना, दिंड्यांना दरवर्षी सानुग्रह अनुदान, चंद्रभागेच्या दोन्ही वाजुने घाट विकसित करणे अशा स्वरुपाच्या अनेक योजना राबविण्यात येतील.

-----०-----

सामाजिक न्याय विभाग

## सर्व संस्थांची शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती समान

सामाजिक न्याय विभागाच्या विविध संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती यामध्ये समानता आणण्यासाठी धोरण निश्चित करण्यात आले आहे. यासंदर्भातला निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यातील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रवोधिनी (अमृत), मुंबई व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत कार्यान्वित असलेल्या तसेच प्रस्तावित करण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती, परदेश शिष्यवृत्ती, प्रशिक्षण, कौशल्य विकास व अन्य कार्यक्रमामध्ये आवश्यक समानता आणण्याकरीता सर्वकष धोरण निश्चित करण्यात आले.

**अधिछात्रवृत्ती-**

सामाजिक न्याय विभागाच्या दि.३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयापूर्वी बार्टी - (प्राप्त अर्ज-७६३), सारथी (प्राप्त अर्ज १३२९), महाज्योती (प्राप्त अर्ज १४५३) या संस्थांमार्फत देण्यात आलेल्या

अधिछात्रवृत्ती जाहिरातींनुसार आलेल्या अर्जामधील कागदपत्रांची पडताळणी करून व शपथपत्र घेऊन एकूण ३५४५ संशोधक विद्यार्थ्यांपैकी पात्र संशोधक विद्यार्थ्यांना ५० टक्के दराने सरसकट अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली.

बार्टी, सारथी, महाज्योती या संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती करीता निश्चित करण्यात आलेली मर्यादा २०० वरून ३०० इतकी करण्यास मा. मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था या संस्थेमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती करीता निश्चित करण्यात आलेली मर्यादा १०० वरून २०० इतकी करण्यात येईल. यु.जी.सी. मार्फत विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्यात येईल.

**परदेश शिष्यवृत्ती-**

परदेश शिष्यवृत्ती योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग, नियोजन विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग या विभागामार्फत स्वतंत्रपणे राबविण्यात येत आहे. या सर्व विभागांच्या परदेश शिष्यवृत्ती योजनेत एकवाक्यता येण्याच्या उद्देशाने सदर योजनेच्या निकषांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल.

**शैक्षणिक अर्हता**- परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांमधून किमान ५५ टक्के गुणासहीत पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. तसेच पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांमधून किमान ५५ टक्के गुणांसहीत पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

परदेशातील शैक्षणिक संस्थेने Offer Letter मध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक कालावधीसाठी लागू केलेली संपूर्ण शिक्षण फी ही संबंधित यंत्रणेने थेट संबंधित शैक्षणिक संस्थेस अदा करावी.

**एकाच कुटूंबातील कमाल पात्रता धारक :-**

परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ एका विद्यार्थ्यास फक्त एकदाच घेता येईल. मात्र, या योजनेअंतर्गत पदव्युत्तर पदवीचा अभ्यास सुरु असतांना त्या विद्यार्थ्यास डॉक्टरेट पदवी (पीएच.डी) साठी शासन निर्णयात अंतर्भूत विषयात दर्जावाढ करण्याची संधी मिळाल्यास सदर विद्यार्थी याच योजनेअंतर्गत पुढील अभ्यासक्रमासाठी लाभ घेण्यास पात्र असेल. त्यासाठी विद्यार्थ्याने निवड समिती/शासनास रितसर अर्ज करून मान्यता घेणे बंधनकारक राहील.

अशा प्रकरणात संबंधित शैक्षणिक संस्थेची जागतिक क्रमवारी (QS World Ranking) त्यावेळी लागू असलेल्या शासन निर्णयाच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. मात्र अशा प्रकरणात विद्यार्थ्यास मिळणारा एकूण लाभाचा कालावधी त्यावेळी लागू असलेल्या शासन निर्णयाच्या मर्यादेतच दिला जाईल. उदा. विद्यार्थ्याने दोन वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम करतांना डॉक्टरेट (पीएच.डी) करण्यासाठी परदेशी शैक्षणिक संस्थेत दर्जावाढ प्राप्त केली तर त्या विद्यार्थ्याला शासनाने विहित प्रक्रियेद्वारे मान्यता दिल्यास त्यानंतरच्या पुढील दोन वर्षांसाठी शासन निर्णयातील नमूद सर्व लाभ घेता येतील. या कालावधी नंतर होणारा पुढील संपूर्ण खर्च मात्र विद्यार्थ्याला करावा लागेल.

एकाच कुटूंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ देता येईल त्यापेक्षा जास्त मुलाना परदेश शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. यासाठी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी तसे प्रतिज्ञापत्र करून देणे बंधनकारक असेल.

एका वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत एका कुटूंवातील दोन पाल्यांचा समावेश असल्यास प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम फेरीत जागा रिक्त राहील्यास एका कुटूंबातील दुसऱ्या पाल्यास लाभ देण्यात येईल.

**विद्यार्थी निवडीचे निकषः**

एकदा किमान शैक्षणिक अर्हता निश्चित केल्यावर विद्यार्थ्याच्या केवळ भविष्याच्या अनुषंगाने अधिक लाभ मिळू शकेल या दृष्टीने त्या वर्षीच्या QS World Ranking ची गुणवत्ता क्रमवारी लक्षात घेऊन विद्यार्थांची गुणवत्ता यादी बनवावी. दोन किंवा अधिक विद्यार्थ्यांची विद्यापीठाची क्रमवारी समान असल्यास अशा प्रसंगी त्यांच्या लगतच्या पदवी परीक्षेची गुणवत्ता लक्षात घ्यावी. कुटूंबाची उत्पन्नाची वार्षिक मर्यादा रु.८.०० लक्ष इतकी राहील.

परदेश शिष्यवृत्ती बाबत विद्यार्थी निवड प्रक्रिया वेळेच्या शिस्तीत होणे तसेच त्या अनुषंगाने पुढील प्रक्रिया शीघ्रतेने होणे गरजेचे असल्याने त्याबाबत सर्व निर्णय त्या विभागाच्या सचिव स्तरावर घेण्यात यावे.

निवड प्रक्रियेची निकड लक्षात घेता विद्यार्थी पुर्ण क्षमतेने उपलब्ध न झाल्यास संबंधित विभागास वर्षातून एक पेक्षा अधिक वेळा निवड प्रक्रिया राबविण्याची मुभा राहील. मात्र त्यात विद्यार्थ्यांचे मेरीट डावलले जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या परदेश शिष्यवृत्ती योजनेकरीता विहित निकषानुसार विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास कुटूंबाच्या उत्पन्नाची वार्षिक मर्यादा व QS World Ranking ची मर्यादा शिथील करून विद्यार्थ्यांस परदेश शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येईल. तथापि, सदर लाभ देतांना उत्पन्नाची वार्षिक मर्यादा रू.८.०० लाखापासून पुढे व QS World Ranking ची मर्यादा २०० पासून पुढे चढत्या क्रमाने ग्राह्य धरण्यात यावी.

अल्पसंख्यांक विभागाच्या परदेश शिष्यवृत्तीची विद्यार्थी संख्या २७ वरून ७५ एवढी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यास खर्चाचा भार हलका व्हावा म्हणून दरवर्षी यु.एस.ए. व इतर देशांसाठी (यु.के. वगळून) १५०० युएस डॉलर, आणि यु.के. साठी ११०० जीबीपी इतका निर्वाह भत्ता /इतर खर्च/ आकस्मिक खर्च म्हणून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

विद्यार्थ्याची अर्हता, उत्पन्न मर्यादा, निवडीचे निकष, निवड पद्धती, तसेच विद्यार्थ्यास मिळणारे आर्थिक लाभ तसेच शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांची संख्या याबाबत बदल करावयाचे असल्यास दि. ३० ऑक्टोबर २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार अ.मु.स. (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या कायमस्वरूपी समितीने निर्णय घेईल.

**महाज्योतीचा वार्षिक कृती आराखडा**

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) या संस्थेने २०२४-२५ या वर्षाकरीता सादर केलेला रू.४५३.६६ कोटी इतक्या रकमेच्या वार्षिक कृती आराखड्यास अर्थसंकल्पीय तरतूदीच्या रु.३००.०० कोटीच्या मर्यादेत चालू आर्थिक वर्षी मान्य करून उर्वरित रू.१५३.६६ कोटी इतक्या रकमेस पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधीन राहून यावर्षी मंजूर करण्यात यावा, यास मान्यता देण्यात आली.

-----०-----

अन्न नागरी पुरवठा विभाग

## गौरी गणपतीसाठी आनंदाचा शिधा

गौरी गणपतीसाठी शिधापत्रिकाधारकांना १०० रुपयात आनंदाचा शिधा हा जिन्नसांचा संच देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक तसेच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्त्याग्रस्त जिल्ह्यातील एपीएल म्हणजेच केशरी शिधापत्रिकाधारक शेतकरी अशा एकूण १ कोटी ७० लाख ८२ हजार ८६ शिधापत्रिकाधारकांना गौरी गणपती उत्सवानिमित्त हा शिधा देण्यात येईल. यामध्ये रवा, चनाडाळ, साखर, एक लिटर सोयाबिन तेल या शिधा जिन्नसाचा समावेश असेल.

-----०-----

ऊर्जा विभाग

## मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना

राज्यातील कृषी पंपधारक शेतकऱ्यांना वीज बील माफी देण्यासाठी मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यामध्ये साडेसात अश्वशक्ती पर्यंतचे पंप वापरणाऱ्या ४४ लाख ६ हजार कृषी पंपधारकांची वीज माफ करण्यात येईल. यासाठी १४ हजार ७६१ कोटी रुपये अनुदान स्वरुपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

-----०-----